प्रजावाणी दि 15/03/2023

# उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याची हदगाव तालुक्यातील जुगारअड्ड्यावर धाड

## अकरा जुगारी पकडले; अडीच लाख रुपयांचा ऐवज जप्त

हदगाव, (वार्ताहर) दि. १४ : उपविभागीय पोलीस अधिकारी शफकत आमना यांनी रविवारी हदगाव तालुक्यातील करोडी या गावात चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली. या वेळी पोलिसांनी ११ जणांना पकडले. त्यांच्याकडून २ लाख ६२ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

भोकरच्या उपविभागीय पोलीस अधिकारी शफकत आमना यांनी एका गुप्त माहितीच्या आधारे रविवारी संध्याकाळी हदगाव पोलीस ठाण्याच्या निवघा पोलीस चौकीच्या हद्दीतील करोडी या गावा लगत असलेल्या शेतात चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली. यावेळी यांनी जुगार खेळणाऱ्या ११ जणांना पकडले. त्यांच्याकडुन सुमारे २ लाख ६२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. या धाडीत हदगाव तालुक्यासह विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील जुगारी आढळुन आले आहेत.

भोकरच्या महिला उपविभागीय पोलीस अधिकारी ७० किलोमीटरवरुन येऊन करोडी या गावात छापा टाकतात परंतु स्थानिक पोलिसांना याबाबतची कल्पना नाही, याबाबीचे सर्वत्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे हदगाव पोलिसांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे. तालुक्यातील सर्व जुगार अड्डे व अवैध धंदे बंद करावेत, अशी मागणी होत आहे.